वाचले- १) शासन राजपत्र ५ जानेवारी, २०१७
२) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४२ ब अन्वये.
३) शासन राजपत्र दिनांक १ जानेवारी २०१६ व दिनांक ७ सप्टेंबर २०१७
४) अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडील आदेश क्र.कक्ष-क/कुका-४/कावि/३५८/२०२० दिनांक २८/८/२०२०
५) उप अभियंता नगर नियोजन विभाग नाशिक महानगरपालिका नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. मनपा/नरवि/वशि/१२८/२०२० दिनांक ११/९/२०२० चे पत्र
६) तलाठी पाथर्डी यांचेकडील जा.क्र.१०९/२०२० दिनांक १८/०९/२०२० चा स्थळ निरीक्षण दाखला.
७) अर्जदार यांचा दिनांक ८/०९/२०२० व २१/१०/२०२० चा करारनामा/शपथपत्र व बंधपत्र.
८) अकृषिक रुपांतरीत कराचा भरणा केलेबाबतचे दिनांक २७/११/२०२० चे डिफेस चलन.
९) **श्री.दिपक कल्याणजी चंदे** रा. १०१, आनंद प्लाझा, दत्तमंदिर सिग्नल जवळ, नाशिकरोड, ता.जि.नाशिक यांचा दिनांक १४/०९/२०२० व २७/११/२०२० रोजीचा अर्ज.

---

COLLECTOR OF NASHIK

**जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक**
**क्र.मशा/कक्ष/३/७-२/एस.आर/७१/२०२०**
**नाशिक दिनांक ११/१२/२०२०**

**आदेश**

**श्री.दिपक कल्याणजी चंदे** रा. १०१, आनंद प्लाझा, दत्तमंदिर सिग्नल जवळ, नाशिकरोड, ता.जि.नाशिक यांनी दिनांक १४/०९/२०२० व २७/११/२०२० चे अर्जान्वये **मौजे पाथर्डी** ता.जि.नाशिक येथील **स.नं. १३/७** चे एकूण **क्षेत्र ४८००.०० चौ.मी.** या क्षेत्रास **रहिवासी** प्रयोजनार्थ अकृषिक सारा व रुपांतरीत कर भरुन घेणेबाबत शासन राजपत्र दिनांक ५ जानेवारी, २०१७ अन्वये विनंती केली आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील नोटीस दिनांक २४/११/२०२० अन्वये अर्जदार यांना **रहिवासी** प्रयोजनासाठी अकृषिक सारा व रूपांतरीत कर भरणा करणेबाबत कळविले असता, अर्जदार यांनी अकृषिक सारा रक्कम रू. २८८/- + रुपांतरीत कर रक्कम रू. १४४०/- असे **एकूण रक्कम रू. १७२८/-** इतकी रक्कम **००२९१७३७०१** या लेखाशिर्षाखाली भरणा करुन दिनांक २७/११/२०२० रोजीचे डिफेस चलनाची प्रत सादर केली आहे.

तरी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४२ ब व **शासन राजपत्र दिनांक ५ जानेवारी, २०१७** अन्वये **मौजे पाथर्डी** ता.जि.नाशिक येथील **स.नं. १३/७** चे एकूण **क्षेत्र ४८००.०० चौ.मी.** (अक्षरी- चार हजार आठशे चौ.मी.) यांस **रहिवास** प्रयोजनार्थ **खालील अटी व शर्तीवर** परवानगी देण्यात येत आहे.

**१) अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरणाच्या नियमानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील. तसेच सहाय्यक संचालक/कार्यकारी अभियंता, नगररचना यांनी मंजुर केलेल्या अभिन्यांसातील खुली जागा (Open Space) तसेच रस्ते स्थानिक प्राधिकरणाकडे वर्ग करणे आवश्यक राहील.**

**२) सदर मिळकतीबाबत कोणताही वाद प्रलंबित असल्यास, तसेच मिळकतीबाबत भविष्यात वाद उपस्थित झाल्यास, त्यास अर्जदार सर्वस्व जबाबदार राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. व सदर अकृषिक रूपांतरण आदेश रद्द होणेस पात्र राहील.**

**३) सदर मिळकतीबाबत भविष्यात सदर जमिन भोगवटदार वर्ग २/ न.अ.श., न. श. , ना.ज.क.म., देवस्थान इनाम, व इतर कोणत्याही नियंत्रित सत्ता प्रकाराची असल्यास तसेच शासनास अधिभार देय असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेणे तसेच त्या वेळीच्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासनास देय होणारा नजराणा / इतर रकमां भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील.**

**४) सदर मिळकती संदर्भात ना.ज.क.म. बाबत भविष्यात काही वाद अथवा शासनास अधिभार देय असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेणे तसेच त्या वेळीच्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासनास देय असलेल्या रकमा भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील.**

**५) सदरचा आदेश अर्जदार यांचा चालु ७/१२ व त्याअनुषंगिक कागदपत्र तसेच करारनामा/शपथपत्र व बंधपत्राच्या अधिन राहून दिलेला आहे.**

६) प्रश्नांकित मिळकतीच्या इतर हक्कांत कोणतेही वित्तीय बोजे असल्यास त्यास अधिन राहुन सदरचे चलन मंजुर केले आहे.

७) सदरचे आदेश हे अर्ज मिळकतीच्या फक्त अकृषिक सारा व रूपांतरीत कर आकारणीबाबत लागु आहेत. सदरचे आदेशाने अर्ज मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तांतरण अथवा मालकी हक्क ठरविला जात नाही.

८) सदर मिळकत पुर नियंत्रण क्षेत्रात येत असल्यास सक्षम प्राधिकारी यांचेकडुन अभिन्यांस मंजूर करून घेणे अर्जदारास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून परवानगी देणेंत येत आहे.

९) अर्ज मिळकतीच्या मालकी अथवा हस्तांतरण हक्काबाबत कोणत्याही न्यायालयात कोणत्याही प्रकारचे वाद प्रलंबित असल्यास सदर प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात संबंधीत न्यायालय यांचे होणारे सर्व आदेश अर्ज मिळकतीच्या हस्तांतरण व मालकी हक्कावर बंधनकारक राहतील तसेच अर्ज मिळकतीच्या हस्तांतरणासाठी संबंधीत न्यायालय यांची परवानगी घेणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.

१०) अकृषिक सारा हा शासनाच्या प्रचलित नियमानुसार भरणे बंधनकारक राहील. तसेच अकृषिक सारा बाबत फरकाची रक्कम भरावयाची असल्यास ती देखील भरणे अर्जदारास बंधनकारक राहील.

११) या आदेशातील कोणत्याही शर्त अगर अटींचा भंग झाल्यास सदरची परवानगी रद्द होणेसपात्र राहील.

COLLECTOR OF NASHIK

मा. अपर जिल्हाधिकारी, सो. नाशिक
यांचे मंजुर टिपणीवरून

(भागवत डोईफोडे)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी नाशिक करीता

प्रति,

**श्री.दिपक कल्याणजी चंदे** रा. १०१, आनंद प्लाझा, दत्तमंदिर सिग्नल जवळ, नाशिकरोड, ता.जि.नाशिक

**प्रत -१) कार्यकारी अभियंता, नगररचना विभाग नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना माहितीसाठी.**

**२) तहसिलदार नाशिक** यांस माहितीसाठी रवाना.

२/- स्थानिक प्राधिकरणाची मंजूरी मिळाल्यानंतर शासन राजपत्र दिनांक ५ जानेवारी, २०१७ अन्वये ६० दिवसाचे आंत आवश्यक ते कागदपत्र घेवून विहित नमुन्यात अर्जदारास सनद करुन देण्यात यावी. तशी अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यात याव्यात.

**३) उप अधिक्षक भुमी अभिलेख, नाशिक** यासं माहितीसाठी रवाना.

**४) तलाठी पाथर्डी** यांना अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेणेसाठी रवाना.

मा. अपर जिल्हाधिकारी, सो. नाशिक
यांचे मंजुर टिपणीवरून

स्वाक्षरीत/-
(भागवत डोईफोडे)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी नाशिक करीता